शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**तात्काळ/प्रथम प्राधान्याने**

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**महोदय/महोदया,**

शासन निर्देश तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील तरतुदींनुसार शिवाजी विद्यापीठाचा प्रस्तावित पंचवार्षिक (सन २०१९-२० ते २०२३-२४ या कालावधीचा) बृहत आराखडा तयार करावयाचा आहे. सदरचा बृहत आराखडा तयार करताना महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ कलम १०७(६) नुसार विद्यापीठाने स्थानिक उद्योगांसाठी आवश्यक असलेली कौशल्य पध्दती, व्यापार व वाणिज्य यासंबंधात महिला, विद्यार्थी, मागासवर्ग, आदिवासी जमाती व त्यांच्याशी संबंधित अन्य घटक यांसारख्या सामाजिक व आर्थिकदृष्टया वंचित असलेल्या युवकांच्या प्रादेशिक गरजा आणि त्याबाबतच्या युवकांच्या आकांक्षा यासाठी उच्च शिक्षणाच्या सुविधांच्या आवश्यक बाबींसंबंधात विद्यापीठाच्या भौगोलिक अधिकारीता क्षेत्रात पध्दतशीर क्षेत्रीय सर्वेक्षण करावयाचे आहे. बृहत आराखडयाचे प्रारूप शासन नियुक्त समितीने तयार केले असून सदर प्रारूपामधील सोबत जोडलेल्या मुद्दयांची माहिती महाविद्यालयांकडून घ्यावयाची आहे. सदरची माहिती दि.२०/०६/२०१८ पर्यंत संलग्नता टी-२ विभागाच्या affiliation.t2@unishivaji.ac.in या संकेतस्थळावर पाठवावी.

कळावे,

आदेशान्वये,

उपकुलसचिव

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ No 6197
दि. 19 JUN 2018